# टिमवीत राष्ट्रीय मतदार दिन साजरा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व भारतीयविद्या विभागातर्फे सदाशिव पेठ येथील केंद्रात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाने मतदार शपथ घेतली. मतदार शपथपत्राचे वाचन रोहिदास तुपसौंदर यांनी केले.

यावेळी श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व इंडोलॉजिकल स्टडीजच्या विभागप्रमुख डॉ. मंजिरी भालेराव सह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरवर्षी राष्ट्रीय मतदार दिनासाठी विशेष थीम निश्चित केली जाते. यावर्षीची थीम राष्ट्रीय मतदार दिन 2025- 'मतदान असे काही नाही, आम्ही नक्कीच मतदान करू' अशी आहे. संपुर्ण भारतात 25 जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. तरूणांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी व त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधत केंद्र सरकारने  2011 पासून हा दिन साजरा करण्यास सुरूवात केली.